स-१

**दि.२८/१२/२०१८ चे**
**बैठकीचे इतिवृत्त**

जा.क्र.मुं.मं./का.अ./बीडीडी-२२६/ १३४ /२०१९
दिनांक :-०७/०२/२०१९

विषय :- बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग येथील प्रकल्पाबाबत मा.अध्यक्ष, म्हाडा व मा.सभापती, मुंबई मंडळ यांचे समवेत चर्चा.

मा.अध्यक्ष म्हाडा यांच्या निर्देशानुसार बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग प्रकल्पाबाबत दि.२८-१२-२०१८ रोजी दुपारी ०१.०० वाजता मा. अध्यक्ष/म्हाडा यांच्या दालनात चर्चा आयोजित करण्यात आली होती. सदरील बैठकीत खालील सन्माननीय लोकप्रतिनिधी, अधिकारी, प्रकल्पाचे वास्तुशास्त्रज्ञ, प्रकल्पाचे कंत्राटदार यांचे प्रतिनिधी, बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग येथील रहिवाश्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. उदय सामंत | - मा.अध्यक्ष, म्हाडा |
| २. | श्री. मधु चव्हाण | - मा. सभापती, मुंबई मंडळ |
| ३. | श्री. सुनिल शिंदे | - मा. आमदार, वरळी विधानसभा मतदार संघ |
| ४. | श्री. धिरजकुमार पंदिरकर | - उपमुख्य अभियंता / बीडीडी / मुं.मं. |
| ५. | श्री. एस.एस. कोन्नूर | - कार्यकारी अभियंता/ बीडीडी / मुं.मं. |
| ६.. | श्री. शशिकांत चौधरी | - वसाहत व्यवस्थापक/ बीडीडी तथा उपअभियंता सा.बां.वि. |
| ७. | श्री. अशोक मुंडे | - सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) कुलाबा विभाग |
| ८. | श्री. तानाजी केसरकर व इतर रहिवाशी, बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग | - |

सदर चर्चेत बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग येथील रहिवाश्यांनी उपस्थित केलेले प्रश्न व म्हाडा अधिकाऱ्यांनी त्यास दिलेले समर्पक उत्तरे व झालेले निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | विषय | उत्तरे / खुलासा | बैठकीत घेण्यात आलेला निर्णय | संबंधित विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | ना.म.जोशी मार्ग येथिल भाडेकरुंची अंतिम पात्रता यादी जाहीर करणे | सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी यांनी पुर्नविकासाच्या पहिल्या टप्प्यातील सात चाळींतील एकूण ५६० भाडेकरुंबाबत पात्रता यादी प्रसिध्द केली असून, ४५१ भाडेकरुंची / लाभार्थ्यांची पहिली अंतिम पात्रता यादी दि.०७-१२-२०१८ व दि.१७-१२-२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यातील १० चाळींतील उर्वरित ३४९ भाडेकरु व चाळ परिसरातील ७८ स्टॉल्स व झोपडीधारक यांच्या पात्रतेबाबत सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे. | १) सक्षम प्राधिकारी यांनी उर्वरित ३४९ लाभार्थ्यांची व ७८ स्टॉल्स / झोपडीधारकांची पात्रता कार्यवाही १५ दिवसांत पूर्ण करावी.<br>२) सर्वेक्षणा दरम्यान बंद आढळलेल्या २४ स्टॉल्स / झोपडया यांचे पुढील आठवडयात पुन्हा सर्वेक्षण करावे.<br>३) चाळ क्र.१३ चे सर्वेक्षण पुन्हा करावे.<br>४) मुख्यअधिकारी / मुं.मं. यांनी पत्र क्र.१०५० दि.१४-१२-२०१८ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार पात्रतेची कार्यवाही पूर्ण करावी. | सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) कुलाबा विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | पहिल्या टप्प्यामध्ये असलेल्या अनिवासी शासकीय बांधकाम (ललित कला भवन आणि फॅमिली वेलफेयर सेन्टर) यांचा ताबा घेऊन ते जमीनदोस्त करणे. | महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ या शासकीय संस्थाची ३ बांधकामे पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात प्रकल्प बाधित होत असून त्यांच्या समवेत करारनामा पंजीकृत करण्यासाठीची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.<br>करारनामा पंजीकृत झाल्यानंतर ललित कला भवन इमारत, पालकर व्यायाम शाळा व लगतचे शौचालय ही बांधकामे रिक्त करुन पाडण्याची कार्यवाही करण्यात येईल. तर आरोग्यधाम इमारतीमधील तळमजल्यावरील कुस्तीआखाडा व पहिल्या मजल्यावरील जिमिन्याशियम या बांधकामाच्या बदल्यात पर्यायी जागा चाळ परिसरातील म्हसकर उद्यान येथे बांधून देण्यात आल्यानंतर तोडण्यात येईल. | महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ या शासकीय संस्थेशी करारनामा करुन रिक्त ललीत कलाभवनाचा ताबा म्हाडास हस्तांतरीत करावा.<br>तोडकामाची कार्यवाही ताबा मिळाल्यानंतर ३० दिवसात पूर्ण करावी. | आयुक्त / महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ<br><br>कार्यकारी अभियंता, बीडीडी / मुंबई मंडळ<br>मेसर्स लक्ष्मण थिटे, वास्तुशास्त्रज्ञ व सल्लागार<br>कंत्राटदार मे.एस.पी. एन.एम.जे. |
| ३. | पहिल्या टप्प्यामध्ये असलेली सरकारी पोलीस कर्मचाऱ्यांची घरे त्वरीत रिकामी करुन म्हाडाने ताबा घ्यावा. | पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात पोलीस विभागाची ताब्यात असलेली व सेवानिवासस्थान म्हणून वितरीत करण्यात आलेली एकूण १२ गाळे प्रकल्पबाधीत होत आहेत.<br>या प्रकल्पाबाधीत १२ गाळयांच्या बदल्यात पोलीस विभागास म्हाडाच्या सेंच्युरी मिल येथील संक्रमण शिबीरातील १-सी इमारतीमधील १०१ ते ११२ अशा एकूण १२ सदनिकांच्या ताबा घेण्यासाठीचा वितरण आदेश दि.२४-०५-२०१८ रोजी देण्यात आला असून अद्याप चाळींतील १२ गाळे पोलीस विभागाने रिक्त केलेले नाहीत. | पोलीस विभागाने १२ संक्रमण गाळे म्हाडाकडून ताब्यात घ्यावेत व ना.म.जोशी मार्ग येथील बीडीडी चाळीतील चाळ क्र.५ खो.क्र.६१ ते खो.क्र.६४ व चाळ क्र.१२ मधील खो.क्र.६५, खो.क्र.६६,खो.क्र.६८,खो.क्र.६९, खो.क्र.७३ ते खो.क्र.७५ व खो.क्र. ७८ असे एकूण १२ पोलीस निवासस्थाने म्हाडास हस्तांतरित करावीत. | सहपोलीस आयुक्त (प्रशासन) मुंबई पोलीस<br><br>पोलीस उपआयुक्त (प्रशासन) मुंबई पोलीस |
| | | सार्वजनिक बांधकाम विभागाकडे चाळ क्र.१२ मध्ये खो.क्र.१,२व ४ ताब्यात आहेत. तसेच सार्वजनिक बांधकामाचे कार्यालय प्रकल्पाच्या टप्पा -१ मध्ये येते. | चाळ क्र.१२ मधील खो.क्र.१,२व४ व कार्यालयाची इमारत त्वरीत रिक्त करुन म्हाडास हस्तांतरित करावी. | संचालक / बीडीडी वसाहत व्यवस्थापक / बीडीडी, सा.बां.वि. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | प्रकल्पाशी असहकार्य करणाऱ्या भाडेकरु विरुध्द निष्कासनाची कायदेशीर कार्यवाही करावी. | बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत असहकार्य करणाऱ्या भाडेकरु विरुद्ध म्हाडा अधिनियम ९५ (अ) नुसार निष्कासनाची कार्यवाहीची तरतूद करण्याबाबत शासनास दि.१३-११-२०१७ रोजी प्रस्ताव सादर केला आहे. | या प्रकरणी त्वरीत म्हाडा अधिनियम अंतर्गत कलम ९५ (अ) ची अधिसूचना जारी करावी. | नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन |
| ५. | ना.म.जोशी मार्ग येथील म्हाडाच्या साइट कार्यालयातच करारनामा पंजीकृत करण्याबाबतची व्यवस्था लवकरात लवकर सुरु करावी. | लाभार्थीसोबत प्रकल्प जागेवर करारनामा पंजीकृत करण्यासाठीची कार्यवाही सहमुख्य अधिकारी यांच्या स्तरावर सुरु आहे. यासाठी महानगर टेलिफोन निगम लिमिटेड यांचेकडून MTNL Lease line घेण्यासाठीची रक्कम म्हाडामार्फत दि.२७-१२-२०१८ रोजी भरली असून Lease line चे काम MTNL युद्ध पातळीवर पूर्ण करणार आहे.<br>जिल्हा मुद्रांक अधिकारी कार्यालयाकडून ऑनलाईन रजिस्ट्रेशनची म्हाडाने रीतसर परवानगी घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. वरील दोन्ही कामे पूर्ण झाल्यानंतर ना.म.जोशी मार्ग बीडीडी चाळीतील कार्यालयात करारनामा पंजीकरणाचे काम त्वरीत सुरु करण्यात येईल. | १) MTNL कडून Lease line चे काम पूर्ण करुन घेण्यात यावे.<br>२)जिल्हा मुद्रांक कार्यालयाकडून ऑनलाईन रजिस्ट्रेशनसाठी आवश्यक परवानगी प्राप्त करावी व या कार्यवाहीसाठी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करावी. | कार्यकारी अभियंता / विद्युत विभाग, मुंबई मंडळ<br>मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/ प्राधिकरण<br>सहमुख्य अधिकारी / मुंबई मंडळ<br>मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/ प्राधिकरण<br>श्री.भिसे, उपसमाज विकास अधिकारी |
| ६. | बीडीडी चाळीमधील अनिवासी गाळेधारकांना १६० चौ.फूट चटई क्षेत्रफळाच्या सदनिकेऐवजी ३०० चौ.फूट चटई क्षेत्रफळाची सदनिका अनुज्ञेय करावी. | सदरील प्रकरणी शासनास अहवाल सादर करण्याबाबत मा.राज्यमंत्री / गृहनिर्माण यांनी दि.१६-११-२०१८ च्या बैठकीत म्हाडास निर्देश दिले आहेत. | सदरील प्रकरणी बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या दि.०४-०१-२०१९ रोजी होणा-या बैठकीत सादर करावी. | मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार / प्रा.<br>वास्तुशास्त्रज्ञ / मुंबई मंडळ |
| ७. | बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील पुनर्वसन इमारतीसाठी Telescopic Taxation पद्धत लागू करावी. | सदरील प्रकरणी शासनास दि.०९-११-२०१७ च्या पत्रान्वये म्हाडाने प्रस्ताव सादर केला आहे. | या प्रकरणी त्वरीत अधिसूचना जारी करावी. | नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग महाराष्ट्र शासन |

शेवटी उपस्थितांचे आभार मानून चर्चा संपन्न झाल्याचे घोषित केले.

E.E/BDD

DyCE(BDD)

( उदय सामंत)
अध्यक्ष
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

प्रत : सभापती / मुंबई मंडळ यांना माहितीसाठी.
प्रत : माहिती कार्यवाहीसाठी -
१) अपर मुख्य सचिव / गृहविभाग / महाराष्ट्र शासन.
२) अपर मुख्य सचिव / गृहनिर्माण / महाराष्ट्र शासन.
३) प्रधान सचिव / नगर विकास विभाग / महाराष्ट्र शासन.
४) सहआयुक्त (प्रशासन) / मुंबई पोलीस.
५) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / म्हाडा.
६) मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ.
७) मुख्य अभियंता - २ / प्राधिकरण.
८) आयुक्त, कामगार कल्याण विभाग.
९) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार / प्राधिकरण.
१०) सहमुख्य अधिकारी / मुंबई मंडळ.
११) उपमुख्य अभियंता / बीडीडी / मुंबई मंडळ.
१२) सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) कुलाबा विभाग.
१३) कार्यकारी अभियंता / बीडीडी / मुंबई मंडळ.
१४) मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी / प्राधिकरण.
१५) संचालक / बीडीडी / सार्वजनिक बांधकाम विभाग.
१६) कार्यकारी अभियंता / विद्युत विभाग / मुंबई मंडळ.
१७) वास्तुशास्त्रज्ञ / मुंबई मंडळ.
१८) श्री. यु.एस.भिसे / उपसमाज विकास अधिकारी.
१९) श्री. तानाजी केसरकर व इतर रहिवाशी, बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग.
२०) मेसर्स लक्ष्मण थिटे / वास्तुशास्त्रज्ञ तथा सल्लागार.
२०) मेसर्स एस.पी.एन.एम.जे. प्रा.लि.